पुढारी
रविवार
७ ऑक्टोबर २०१२



# 'कमला'मध्ये 'नो व्हेईकल डे'

कोल्हापूर : प्रतिनिधी

वाढत्या प्रदूषणाला आळा घालणे तसेच पर्यावरणाच्या रक्षणाबाबत प्रबोधन होण्यासाठी कमला महाविद्यालयात एक दिवस 'नो व्हेईकल डे' पाळण्यात आला. महाविद्यालय विद्यार्थी मंडळाची सचिव नीलम पाटील हिने पुढाकार घेऊन हा उपक्रम यशस्वी करून दाखवला.

शहर व जिल्ह्यात 'नो व्हेईकल डे'चे अनेक उपक्रम शासकीय कार्यालय तात्पुरत्या स्वरूपात राबवले गेले; पण आता महाविद्यालय स्तरावर याबाबत प्रबोधन होणे गरजेचे आहे. आजच्या युवा पिढीने जर आतापासूनच पर्यावरणाच्या रक्षणासाठी ठोस पावले उचलली नाहीत तर भविष्यात अनेक पर्यावरणीय धोक्यांना सामोरे जावे लागणार आहे.

कमला महाविद्यालयात नीलम पाटील या विद्यार्थिनीने पुढाकार घेऊन संस्था व सर्व विद्यार्थिनींना शनिवारी 'नो व्हेईकल डे' पाळण्याचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयात विद्यार्थिनींनी तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व संस्थेचे सचिवही या उपक्रमात सहभागी झाले. प्रत्येकजण वाहनाशिवाय शनिवारी महाविद्यालयात आले. याप्रमाणे प्रत्येक महाविद्यालयाने एक एक दिवस असा नो व्हेईकल डे पाळला तरी इंधन बचत होण्याबरोबरच पर्यावरण वाचवण्यात काहीसे यश मिळणार आहे.



कोल्हापूर : कमला महाविद्यालयात 'नो व्हेईकल डे'निमित्त विद्यार्थिनी वाहनाशिवाय शनिवारी महाविद्यालयात आल्या. (छाया : नाज ट्रेनर)